# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## नागपूर विभागीय मंडळ, सिव्हील लाईन्स्, नागपूर

फोन ०७१२ २५६५४०३ फॅक्स ०७१२ २५६१७७५


पत्र क्रमांक: नाविमं./लेखा /१५१४
नागपूर, दिनांक: २३ /०७/२०२०

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये ,
नागपूर विभागीय मंडळ,
नागपूर

विषय :– सन २०२०–२१ चे माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालय नोंदणी शुल्क/शिक्षण संक्रमण शुल्काबाबत. .
(कालावधी जुलै २०२० ते जुन २०२१)

संदर्भ :– राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्रमांक :रा.मं./प्रकाशन शिक्षण संक्रमण/ ३२२२ दिनांक१५/०७/२०२०.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्य त येते की, मंडळ नियमावलीतील नियम क्रमांक ४७(७) व ९४(७) नुसार मंडळाअंतर्गत मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदणी शुल्काची रक्कम फेब्रुवारी/ मार्च २०२० च्या विद्यार्थी संख्येला अनुसरुन मंडळाकडे दिनांक १० ऑगस्ट २०२० किंवा त्यापूर्वी प्राप्त होईल या दृष्टीने बँक ऑफ इंडियाच्या चलनाद्वारे भरणा करुन चलनाची प्रत माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या पत्रासह सादर करावयाची आहे.१० ऑगस्टनंतर नोंदणी शुल्क भरणा–या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडुन सोबतच्या परिपत्रकानुसार दंड आकारण्यात येईल.

उपरोक्त संदर्भांकित पत्रानुसार शिक्षण संक्रमणाच्या मूल्यामध्ये बदल करण्यात आला आहे त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१.किरकोळ अंकाचे शुल्क रु.२०/– ऐवजी रु.२५/– करण्यात आलेले आहे.
२.अंकाचे वार्षिक शुल्क रु.२००/– ऐवजी २५०/– करण्यात आलेले आहे.
३.मंडळाचे मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना प्रत्येक महिन्याचे किमान २ अंकांचे वार्षिक वर्गणीदार होणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.
४.शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना दरवर्षी मंडळमान्यता /मान्यतावर्धित करण्याचे शुल्क भरतांना शिक्षण संक्रमणाच्या २ अंकांचे वार्षिक वर्गणीचे (रु.५००/–) शुल्क भरणे बंधनकारक /अनिवार्य करण्यात आलेले आहे.
५.नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणीचे प्रपत्रात शाळा ,कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक ,शाळा /क.महाविद्यालयाचे नाव, अदयावत पत्ता पिनकोडसह सर्व माहिती सविस्तर पाठवावी.

तेव्हा उपरोक्त बदलानुसार कार्यवाही करून दिनांक १० ऑगस्ट,२०२० च्या आत बॅक ऑफ इंडियाचे खाते क्रमांक **HSC 87061021000020 IFSC Code BKID0008706,SSC 870610210000019 IFSC Code BKID0008706** मध्ये चलन/आरटीजीएस /एनईफएटीद्वारे नोंदणी शुल्क/शिक्षण संक्रमण शुल्काचा भरणा करुन सदर चलन / आरटीजीएस/ एनईफएटीची पावती शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या पत्रासोबत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

सदर माहितीचे प्रपत्र मंडळाचे **www.nagpureduboard.in** संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

(रविकांत देशपांडे)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपी:– १.सचिव, राज्य मंडळ, पुणे यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
२.विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
३.शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद भंडारा/ चंद्रपूर/नागपूर/वर्धा/गडचिरोली/ गोंदिया सदर बाब आपल्या स्तरावरुन माध्यमिक शाळा/क. महाविद्यालयांना लेखी कळवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अविलंब या कार्यालयास पाठवावा.
४.शाखाधिकारी/शाखाप्रमुख मान्यता विभाग, माध्यमिक/उच्च माध्यमिक यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

# सन 2020–21 या वर्षाच्या नोंदणी शुल्क माहितीचे प्रपत्र

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक साठी वेगवेगळे चलान व प्रपत्र भरावीत.

1) शाळेचे / कनिष्ठ महाविदयालयाचे नाव : ------------------------------
व निर्देशांक(इंडेक्स क्रमांक) व अदययावत पुर्ण पत्ता ------------------------------
पिनकोडसह

**<u>नोंदणी शुल्काबाबतचा तपशील</u>**

अ) एकूण विदयार्थी संख्या ------------------------------

ब) 01 ते 100 विदयार्थी **(<u>माध्यमिक</u>)** रुपये 1000/– (रुपये एक हजार)

क) त्यापुढील प्रत्येक 100 विदयार्थ्यासाठी **(माध्य.)** रुपये 200/–

ड) 01 ते 100 विदयार्थी **(<u>उच्च माध्यमिक</u>)** रुपये 1000/– (रुपये एक हजार)

इ) त्यापुढील प्रत्येक 100 विदयार्थ्यासाठी (उच्च माध्य.) रुपये 400/–

फ) शिक्षण संक्रमण रुपये 250/–

2) चलानव्दारे भरलेली एकूण रक्कम
(ब/क/फ) (माध्यमिक) रुपये ------------------------------
(ड/इ/फ) (उच्च माध्यमिक) ------------------------------
चलान क्रमांक व दिनांक ------------------------------

टीप) नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क दि.10 ऑगष्ट पर्यंत या कार्यालयात पाठवावे. अन्यथा खालील प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

1) दि.11 ऑगष्ट ते 31 ऑगष्ट रु. 200/– दंड
2) दि.01 सप्टेंबर ते 30 सप्टेंबर रु. 300/– दंड
3) दि.01 ऑक्टोबर पासून नियमित विदयार्थ्याची आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखेपर्यत रु. 500/– दंड

स्वाक्षरी
मुख्याध्यापक / प्राचार्य
शिक्का